www.aiche.org/ccps

Process Safety Beacon — 10 Year Anniversary

http://www.aiche.org/CCPS/Publications/Beacon/index.aspx

उत्पादन क्षेत्रातील व्यक्तिंसाठी संदेश

या आवृत्तीचे प्रायोजक ioMosaic

www.iomosaic.com

# तुमची चिन्हे व लेबल्स संदिग्ध नाहीत ना?

मार्च २०१३

नोव्हेंबर २०१२ च्या "समस्या ओळखा" बीकॉन स्पर्धेतील हे उजवीकडील छायाचित्रात एकसारख्या दिसणारे पंप दिसत आहेत. त्याच छायाचित्रात त्यांना योग्य प्रकारे लेबल लावले नसल्याचे दिसते. जर तुम्हाला एक पंप देखभाल करण्यास सांगितले तर तुम्ही योग्य त्याच पंपावर काम करीत आहात याची खात्री कशी कराल?

लेबलचा अभाव ही एक सुरक्षा समस्या होऊ शकते, आणि त्रोटक किंवा संदिग्ध लेबल्स किंवा माहिती चिन्हे याहीपेक्षा घातक ठरू शकतात. खालील छायाचित्रे ही प्रक्रीया संयंत्रे व दैनदिन जीवनातील संदिग्ध लेबल्स किंवा चिन्हांची उदाहरणे आहेत तुमच्या कारखान्यात संदिग्ध लेबल्स किंवा चिन्हे आहेत का?










Similar labels on these pipes contributed to unloading the wrong material into a storage tank. A chemical reaction resulted, releasing a toxic gas which injured 6 people. See the April 2012 Beacon.













- लेबल नसलेली उपकरणे, गहाळ झालेली लेबल किंवा सुवाच्य नसलेली लेबल शोधा. तुम्हाला शक्य असेल तर लेबल ठीक करा किंवा ही समस्या ठीक करू शकणाऱ्या व्यक्तिला सूचित करा.
- छायाचित्रात जशी दाखविली आहेत तशी संदिग्ध लेबल किंवा चिन्हे शोधा व त्यांवर उपाय करा.
- तुमच्या कारखान्यातील उपकरणांवर लावलेली लेबले आणि चिन्हे ही उत्पादन कार्यपध्दती, देखभालीच्या कार्यपध्दती, आपत्कालीन कार्यपध्दती, आणि कारखान्यातील इतर दस्तावेजांमध्ये नमूद केल्याप्रमाणे आहेत याची खात्री करा.
- हस्तलिखित किंवा इतर तात्पुरती लेबल्स वापरून संदिग्धता वाढवू नका. एखादे लेबल बदलावयाचे असेल तर योग्य लेबल वापरा, आणि बदल व्यवस्थापन आढावा घ्या,
- रसायनांची नांवे पूर्ण लिहीण्याबाबत सातत्य ठेवा. उदाहरणार्थ, "MMA" चा अर्थ एका प्लँटमध्ये मिथाइल मिथाक्रीलेट असा असू शकतो तर दुसऱ्या प्लँटमध्ये मोनो मिथाइल अमाइन असा असू शकतो आणि इतर ठिकाणी पूर्णपणे वेगळा असू शकतो. तुमच्या प्लँटमधील प्रत्येकजण लेबल्सचा अर्थ जाणतो याची खात्री करा!




## *सुरक्षेच्या दृष्टीने योग्य लेबल्स व चिन्हे वापरा!*

AIChE © 2008. सर्व हक्क राखीव. अव्यावसायिक, शैक्षणिक हेतूसाठी वापरण्यास प्रोत्साहन आहे. तथापि CCPS शिवाय अन्य कोणासही पुनर्विक्रीसाठी वापर करण्यास सक्त मनाई आहे. संपर्क : ccps_beacon@aiche.org किंवा ६४६–४९५–१३७१

हे बीकॉन सहसा अरेबिक, अफ्रीकन, चिनी, डॅनिश, डच, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, गुजराती, हिब्रू, इटालियन, जपानी, कोरियन, मालय, मराठी, नॉर्वेजियन, पर्शियन, पोलीश, पोर्तुगीज, रोमानियन, रशियन, स्पॅनिश, स्वीडीश, तेलगू, थाई, तुर्की, आणि व्हीएतनामी इत्यादी भाषांमध्ये उपलब्ध आहे.

This Beacon is translated in Marathi by Mr. S.K. Gulawani, Maharashtra, India.